क्रमांक : ५२

# महाराष्ट्र विधानसभा

## पत्रक भाग दोन

## गुरुवार, दिनांक मार्च २३, २०२३/ चैत्र २, १९४४ (शके)

५२.अध्यक्ष : शुक्रवार, दिनांक २४ मार्च,२०२३ रोजी अशासकीय कामकाज घेण्यात येणार आहेत. शुक्रवार, दिनांक १० मार्च,२०२३ रोजी कामकाजाच्या क्रमात दर्शविलेली तथापि, उक्त दिवशी अशासकीय कामकाज न झाल्याने विचारार्थ प्रलंबित एकूण ०८ अशासकीय विधेयके चर्चेकरिता घेण्यासाठी निश्चित करण्यात आले आहेत. अशासकीय विधेयकांना द्यावयाचा वेळ अशासकीय विधेयके व ठराव समितीने निश्चित करावयाचा असतो. तथापि, सध्या अशासकीय विधेयके व ठराव समिती नव्याने घटित करण्यात येत असल्याने मी शुक्रवार, दिनांक २४ मार्च,२०२३ रोजी अशासकीय कामकाजासाठी उपलब्ध असलेल्या १५० मिनिटांच्या वेळेपैकी ३० मिनिटांचा वेळ पुर:स्थापनार्थ असलेल्या विधेयकांना व उर्वरित १२० मिनिटांचा वेळ खालील नमूद असलेल्या एकूण ०८ अशासकीय विधेयकांना चर्चेकरिता देत आहे.

| | | |
|---|---|---|
| १( | सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५० – भारतीय दंड संहिता व फौजदारी प्रक्रिया संहिता (महाराष्ट्र सुधारणा) विधेयक,२०१९ – **श्री. प्रताप सरनाईक, वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| २) | सन २०१९ चे विधानसभा विधेयक क्रमांक ५१ – महाराष्ट्र धर्मांतर बंदी विधेयक, २०१९ – **श्री.अतुल भातखळकर,वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ३) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ९ - महाराष्ट्र दारुबंदी (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री.अतुल भातखळकर,वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ४) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक १० – महाराष्ट्र चिकित्सालयीन आस्थापना (नोंदणी व विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री.अतुल भातखळकर,वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ५) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक ११ - महाराष्ट्र कर्मचाऱ्यांची मातापित्याप्रती जबाबदारी आणि उतरदायित्व व देखभाल यासबंधीच्या मानकांबाबत विधेयक, २०२० - **श्री.अमित साटम,वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ६) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २२ – राज्यातील अल्पभूधारक शेतकऱ्यांना निवृत्तीवेतन देण्याबाबत विधेयक, २०२० - **श्री.प्रकाश आबिटकर,वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ७) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २३ – महाराष्ट्र झोपडपट्टी (सुधारणा, निर्मुलन आणि पुनर्विकास) (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री.अतुल भातखळकर,वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |
| ८) | सन २०२० चे विधानसभा विधेयक क्रमांक २४ – महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन (सुधारणा) विधेयक, २०२० - **श्री. सुनिल प्रभू,वि.स.स. यांचे** | १५ मिनिटांपेक्षा जास्त नाही. |

**विधान भवन,**
**मुंबई**
**दिनांक : २३ मार्च, २०२३**

**राजेन्द्र भागवत**
**प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

**प्रति :**

(१) महाराष्ट्र विधानसभेचे सर्व मा.सदस्य.
(२) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व अधिकारी.
(३) महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयातील सर्व कक्ष यांना अग्रेषित.
(४) संगणक कक्ष व MKCL